सातारा तालुका पोलीस ठाणे,सातारा
दुरध्वनी क्रमांक :-०२१६२/२३८६०७
ई-मेल
sataratps.satara@mahapolice.gov.in

प्रेसनोट ता.२५/११/२०२५

## सातारा तालुका पोलीस ठाणेकडुन २६/११ दिन निमित्त घेणेत आलेले रक्तदान शिबीर व सन २०२५ गणराया व नवदुर्गा ॲवार्ड बक्षीस वितरण समारंभ

---ooo---

दि.२५/११/२०२५ रोजी मा.श्री.तुषार दोशी,पोलीस अधीक्षक सातारा सो, मा.अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर सो. व मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री राजीव नवले सो यांचे मार्गदर्शनाखाली सातारा तालुका पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री निलेश तांबे यांनी २६/११/२००८ रोजी मुंबईतील ताज हॉटेल मध्ये झालेल्या दहशतवादी हल्यात वीरमरण आलेल्या सर्व भारतमातेच्या व बळी गेलेल्या निष्पाप पोलीस अधिकारी व पोलीस अमंलदार व नागरीकांना भावपुर्ण श्रध्दांजली प्रित्यर्थ सातारा तालुका पोलीस ठाणेचे वतीने रक्तदान शिबीर तसेच गणराया व नवदुर्गा ॲवार्ड बक्षीस वितरण समारंभ हा कार्यक्रम आयोजित केले होता.सदर रक्तदान शिबीर व गणराया व नवदुर्गा ॲवार्ड बक्षीस वितरण समारंभ करिता मा.श्री.तुषार दोशी,पोलीस अधीक्षक सातारा सो,मा.अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर व मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.राजीव नवले सो,सातारा, मा.पोलीस निरीक्षक,सातारा शहर पो.स्टे.राजेंद्र मस्के सो.मा.सपोनि श्री.काटकर सातारा,पोउनि श्री.गुरव,सातारा तालुका पोलीस अंमलदार व रोटरी क्लब ऑफ सातारा, रोटरी क्लब ऑफ सातारा चॅरिटेबल,रो.किशोर डांगे,अध्यक्ष रो.क्लब ऑफ सातारा श्री अभिजीत लोणकर,श्री.नीरज गांधी,ॲड,सुनील सांगळे,प्रा.धनंजय देवी,ॲड श्री.योगेंद्र सातपुते व सातारा तालुका पोलीस ठाणे हददीतुन बहुसंख्येने पोलीस पाटील,गणेश व नवरात्र मंडळांचे कार्यकर्ते/ पदाधिकारी,शांतता कमिटी सदस्य,ग्रामस्थ उपस्थित होते.

सदर रक्तदान शिबीर मध्ये तब्बल एकुण ४९ पोलीस बांधव,पोलीस पाटील,गणेश मंडळांचे कार्यकर्ते/ पदाधिकारी,ग्रामस्थ यांनी रक्तदान केले.तसेच गणराया ॲवार्ड २०२५ मध्ये सहभागी झालेले सातारा तालुका पोलीस ठाणे हददीतील गणेश मंडळांचे **१**.परळी-शेंद्रे-यवतेश्वर **२**.कोंडवे -वेण्णानगर **३**.अंगापुर-तासागांव **४**.लिंब-पाटखळ असे एकुण चार विभाग करणेत आले असुन प्रत्येक विभागामधेन प्रथम,दवीतीय,तृतीय,उत्तेजनार्थ अशी १६ गणेश मडंळ तसेच प्रत्येक विभागातुन उत्कृष्ठ एक गाव एक गणपती अशी ४ अशी एकुण २० गणेश मंडळांना व नवदुर्गा चार विभागातुन ४ दुर्गामंडळाना मा.पोलीस अधीक्षक श्री.तुषार दोशी यांचे हस्ते पुरस्कार देवुन गौरविण्यात आले आहे.तसेच उपस्थितांना मा.पोलीस अधीक्षक श्री.तुषार दोशी यांनी मार्गदर्शन केले.

**प्रति,**
**सर्व संपादक,सातारा**

पोलीस निरीक्षक
सातारा तालुका पोलीस स्टेशन